## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३२/२०२०** **दिनांक २१/०४/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके**, | **डॉ. विजय मोरे**, | **डॉ. शितल यादव**, |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १५/०४/२०२० ते २१/०४/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २२/०४/२०१९ सकाळी ८:३० पासून २६/०४/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१५/०४** | **१६/०४** | **१७/०४** | **१८/०४** | **१९/०४** | **२०/०४** | **२१/०४** | | **२२/०४** | **२३/०४** | **२४/०४** | **२५/०४** | **२६/०४** |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३४ | ३३ | ३३ | ३३ | ३३ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २४ | २४ | २४ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ३ | १ | २ | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६१ | ७६ | ८१ | ८४ | ८७ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | २५ | ३२ | ३४ | ३५ | ३४ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ३ | २ | ४ | ४ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | द. | आ. | नै. | द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | **५१९७.२** |

### हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २२ ते २६ एप्रिल २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **कोविड १९ बाबत शेतकऱ्यांनी घ्यावयाची दक्षता** | | • कोरोना विषाणूचा संसर्ग प्रतिबंधित करण्यासाठी शेतीतील कामे करताना स्वच्छता व सुरक्षिततेच्या खबरदारीच्या उपाययोजनांचे पालन करावे.<br>• शेतीतील सर्व कामे करताना शेतकऱ्यांनी / शेतमजुरांनी तोंडाला मास्क लावावे तसेच एकमेकांमध्ये ४-६ फुट अंतर राहील याची दक्षता घ्यावी. ठराविक वेळाने साबणाने हात स्वच्छ धुवावेत.<br>• शेतीसाठी आवश्यक खरेदी आणि विक्री करताना शासनाने नेमून दिलेल्या नियमांचे पालन करावे. |
| **उन्हाळी भात** | **दाणे भरणे अवस्था** | • उन्हाळी भात पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने शेतात पाण्याची पातळी ५ सें. मी. पर्यत ठेवावी. |
| **आंबा** | **फळधारणा अवस्था** | • काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची 'नूतन' झेल्याच्या सहाय्याने चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह सकाळी १० वाजेपर्यंत किंवा संध्याकाळी ४ नंतर काढणी करावी. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची फळे काढल्यानंतर सावलीमध्ये ठेवावीत तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान १५ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये तसेच फळे काढणीस तयार होण्याच्या एक महिना अगोदर झाडास पाणी देण्याचे बंद करावे.<br>• काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी काढणी नंतर लगेचच फळे ५२° सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळमाशीच्या सापळ्यात ठेवलेले रासायनिक खादय आमिष (मिथाईल युजेनोल) ६ ते ७ आठवड्यानंतर बदलावे. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी. पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• आंबा नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. १० **x** १० मीटर अंतरावर व घन पध्दतीने लागवडीसाठी ५ **x** ५ मीटर अंतरावर १ **x** १ **x** १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि तीन ते चार घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. |
| **काजू** | **फळधारणा अवस्था** | • पूर्ण तयार झालेल्या काजू बियांची काढणी करावी. काढणी केलेल्या बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवून हवाबंद ठिकाणी साठवणूक करावी.<br>• नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना दर आठ दिवसांनी प्रती कलम १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी. तसेच कलमांच्या आळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यासाठी आळ्यामध्ये वाळलेले गवत, पालापाचोळा किंवा पोलीथीनचे |

| | | |
|---|---|---|
| | | आच्छादन करावे.<br>• काजू नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात ७ **x** ७ मीटर किंवा ८ **x** ८ मीटर अंतरावर ०.६ **x** ०.६ **x** ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि दीड ते दोन घमेली **चांगले कुजलेले शेणखत** आणि अर्धा किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. |
| **नारळ** | **-** | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी.<br>• नारळ नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात ७.५ **x** ७.५ मीटर किंवा ८ **x** ८ मीटर अंतरावर १ **x** १ **x** १ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि १० किलो **चांगले कुजलेले शेणखत** आणि २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. |
| **सुपारी** | **-** | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने सुपारी बागेस ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• सुपारी नवीन लागवडीसाठी निवडलेल्या क्षेत्रातील साफ सफाई करून घ्यावी. एप्रिल - मे महिन्यात २.७ **x** २.७ मीटर अंतरावर ०.६ **x** ०.६ **x** ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि २० किलो **चांगले कुजलेले शेणखत** आणि अर्धा किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून तयार ठेवावेत. |
| **पांढरा कांदा** | **पक्वता** | • कांदा काढणीस तयार होण्याच्या २ आठवड्याअगोदर पिकास पाणी देणे थांबवावे जेणेकरून पानातील रस कांद्यामध्ये उतरून कांदा काढणीस तयार होईत. |
| **दुभती जनावरे** | **-** | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. |
| **कुकुटपालन** | **-** | • कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**